स्वातंत्र्य सैनिक आणि त्याची/तिचा, पत्नी/पती
अथवा एक साथीदार यास ... ...
प्रवास सवलत देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: पीओजेस-१०९०/प्र. क्र. ७७/९०/स्वासैकक्ष,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ डिसेंबर, १९९०.

वाचा:- १] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: पीओजेस-१०८५/
विक-१/स्वासैकक्ष, दिनांक १२. ८. १९८५,
२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: पीओजेस-१९८७/
विप्रभ/स्वासैकक्ष, दिनांक ३ ऑगस्ट, १९८७,
३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: पीओजेस-१०८८/
स्वासैकक्ष, दिनांक २१ एप्रिल, १९८९.

शासन निर्णय:- राज्यातील पेन्शनधारक स्वातंत्र्य सैनिक/विधवा पत्नी/विधुर पती यांना वर निर्देशित केलेल्या दिनांक २१ ऑगस्ट, १९८५ व ३ ऑगस्ट, १९८७ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये रु. ५००/- प्रमाणे प्रवासखर्च म्हणून आर्थिक अनुदान देण्यात येते. तसेच दिनांक २१ एप्रिल, १९८९ च्या शासकीय निर्णयान्वये स्वातंत्र्य सैनिक आणि त्याची/तिचा, पत्नी/पती अथवा १ साथीदार यांना वर्षातून एकदा त्यांच्या पसंतीप्रमाणे महाराष्ट्रात कोणत्याही एका ऐतिहासिक अथवा धार्मिक स्थळास भेट देण्यास राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्वसाधारण गाड्यातून विनामूल्य प्रवास करण्याची सवलत देण्यात आली आहे. स्वातंत्र्य सैनिकांना राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसने वर्षभर विनामूल्य प्रवास करण्याची सवलत देण्याचा प्रश्न गेले काही दिवस शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, स्वातंत्र्य सैनिकांना प्रवासखर्च म्हणून दरवर्षी रु. ५००/- प्रमाणे देण्यात येणारे आर्थिक अनुदान व वर्षातून एकदा राज्यातील कोणत्याही एका ऐतिहासिक अथवा धार्मिक स्थळास भेट देण्यास राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्वसाधारण गाडीतून विनामूल्य प्रवास करण्याची देण्यात आलेली सवलत या ऐवजी, त्यांना त्यांच्या पती/पत्नी अथवा एका सहकाऱ्याबरोबर महाराष्ट्र राज्यात कोठेही राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्वसाधारण/निम-आराम/आराम गाड्यातून वर्षभर विनामूल्य प्रवास करण्याची सवलत देण्यात यावी. मात्र स्वातंत्र्य सैनिकांना अशाप्रकारे वर्षभर विनामूल्य प्रवास सवलतीचा लाभ घ्यावयाचा नसल्यास त्यांना सध्या असलेली सवलत चालू ठेवण्याचा विकल्प देण्यात यावा. शासनाने पुढे असाही ... आहे की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला, सवलत घेणाऱ्या

[कृ. मा. प.. ]

2 9 DEC 1990

प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकामागे शासनाने प्रतिवर्षी रु.१,०००/- या दराने प्रतिपूर्ती करावी. ही सवलत स्वातंत्र्य लढयातील स्वातंत्र्य सैनिक, गोवा व हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील सत्याग्रही, आर्यसमाज चळवळीतील स्वातंत्र्य सैनिक व महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांचे कुटुंबिय [विधवा पत्नी/आई-वडील] अशा सर्व पेन्शनधारक स्वातंत्र्य सैनिकांना उपलब्ध राहील.

२. स्वातंत्र्य सैनिकाला वर्षभर विनामूल्य प्रवास सवलतीचा लाभ घ्यावयाचा नसल्यास त्यांना सध्या असलेली सवलत चालू ठेवण्याचा विकल्प द्यावा लागेल. स्वातंत्र्य सैनिकाने दिलेला विकल्प किमान एक वर्षापर्यंत त्यास बदलता येणार नाही. सर्व जिल्हाधिका-यांनी आपापल्या जिल्हयातील पेन्शनधारक स्वातंत्र्य सैनिकाकडून विहित नमुन्यात लेखी विकल्प घ्यावा व त्याची नोंद कार्यालयातील नोंदवहीत करावी. [विकल्प भरून घेण्यासाठी अर्जाचा विहित नमुना परिशिष्ट "अ" नुसार सोबत जोडला आहे]. त्यानंतर ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या गाडयांमधून वर्षभर विनामूल्य प्रवास करण्याच्या सवलतीचा लाभ घेण्याचा लेखी विकल्प दिला असेल अशा स्वातंत्र्य सैनिकांच्या नांवाची यादी तयार करून जिल्हयातील संबंधित आगार व्यवस्थापक, राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्याकडे पाठवावी. अशी यादी प्राप्त झाल्यानंतर आगार व्यवस्थापक, स्वातंत्र्य सैनिक, त्यांची पत्नी अथवा एक साथीदार यांना महामंडळाच्या सर्वसाधारण/निम-आराम/आराम गाडीने वर्षभर विनामूल्य प्रवास करण्यासाठी ठराविक नमुन्यात [पासाचा नमुना महामंडळाने ठरविल्याप्रमाणे असेल] पास देण्याची आवश्यक व्यवस्था करतील व त्याप्रमाणे जिल्हाधिका-यांना कळवतील. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला, सवलत घेणा-या प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकामागे शासनाने प्रतिवर्षी रु.१,०००/- या दराने प्रतिपूर्ती करावयाची असल्यामुळे ज्या स्वातंत्र्य सैनिकास महामंडळाने विनामूल्य प्रवासासाठी पास दिला आहे, त्यांची जिल्हा कार्यालयात नोंदवहीत नोंद घेण्यात यावी म्हणजे महामंडळास प्रतिपूर्ती करतेवेळी पडताळणी करणे शक्य होईल.

3. हे आदेश दिनांक १ जानेवारी, १९९१ पासून अंमलात येतील. मात्र ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी १९९०-९१ या आर्थिक वर्षात प्रवास खर्चासाठी देय असलेली रु.५००/- ची वार्षिक आर्थिक मदत शासनाकडून घेतली असेल, अशा स्वातंत्र्य सैनिकांना जर चालू आर्थिक वर्षातील शेवटच्या तिमाहीसाठी नविन सवलतीचा लाभ घ्यावयाचा असेल तर विकल्पाचा अर्ज देताना त्यांना रु.१२५/- [रु.५०० च्या प्रमाणानुसार [illegible] रक्कम] शासनाच्या तिजोरीत भरणा करावी [illegible]

..3/-

ज्या स्वातंत्र्य सैनिकांना नवीन सवलतीचा लाभ दिनांक १ जानेवारी, १९९१ पासून द्यावयाचा नसेल, असे स्वातंत्र्य सैनिक वर परिच्छेद २ मध्ये सूचविल्यानुसार विकल्प देऊन या सवलतीचा लाभ दिनांक १.४.१९९१ या आर्थिक वर्षापासून घेऊ शकतील.

४. सदर योजनेसाठी होणारा खर्च कोणत्या लेखा शीर्षाखाली दाखविण्यात यावा व तो कसा भागविण्यात यावा तसेच शासनाने महामंडळास दरवर्षी खर्चाची प्रतिपूर्ती कशाप्रकारे करावी यासंबंधी स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-सीआर-११६६/व्यय-४, दिनांक १७.११.९० अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ल. आ. काकडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
अध्यक्ष, सभापती व इतर सदस्य, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
अध्यक्ष, व्यवस्थापक संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई २ प्रति,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर २ प्रति,
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक/अपर मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,
सर्व विशेष सचिव/सचिव यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, व्यय ४, मंत्रालय, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग, का. क्र. २५, मंत्रालय, मुंबई,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती

—x—